ePaper

| वर्ष - 7 | अंक - 278 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 24 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## अजय महाराज बारस्करांवर मराठा आंदोलकांचा हल्ल्याचा प्रयत्न!



### आतील पानांत


- निवडणूक आयोगाचा दणका...
- मनोहर जोशी अनंतात विलीन!
- ‘इंडिया’ आघाडी पुन्हा रुळांवर!
- रुटच्या शतकी खेळीने इंग्लंडला सावरलं!


## उत्पादनात वाढ, पण राजकीय इच्छाशक्तीचा अभाव?

# H. A. कामगारांना वेतनवाढीची प्रतीक्षा!

### 2007 पासून दोन वेतनवाढ थकीत : केंद्र सरकारच्या निर्णयाकडे कामगारांचे लक्ष

। नवी दिल्ली । महाईन्यूज

**पिंपरी येथील भारत सरकारची हिंदुस्थान ॲण्टीबायोटिक्स (एचए) ही कंपनी व्यवस्थान आणि कामगारांच्या सहकार्याने उत्पादन क्षमतेमध्ये वाढ झाली आहे. पण, कामगारांचे २००७ आणि २०१७ असे दोन वेतनवाढ थकीत आहेत. केंद्र सरकार आणि स्थानिक नेत्यांच्या उदासीनतेमुळे कामगारांना वेळेत पगार आणि वेतनवाढीसाठी आजही प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे औद्योगिकनगरी पिंपरी-चिंचवडमधील कामगार विश्वामध्ये केंद्र सरकारच्या उदासीन धोरणाबाबत नाराजी व्यक्त होत आहे.**

वास्तविक, कंपनीकडे पुरेसे पैसे नसल्याने कंपनी चालू ठेवणे व्यवस्थापनाला कठीण जात आहे. एच.ए. मजदूर संघाचे अध्यक्ष खासदार मनोज कोठक आहेत. तसेच, स्थानिक खासदार म्हणून श्रीरंग बारणे यांनी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन कामगारांना दिलासा देणे अपेक्षीत आहे. परंतु, राजकीय उदासीनतेमुळे आणि केंद्राकडे सक्षमपणे पाठपुरावा न केल्यामुळे कामगारांना न्याय मिळत नाही, अशी स्थिती आहे. पुणे जिल्ह्यातच नव्हे, तर महाराष्ट्रभरामध्ये एच.ए. कंपनीचा लौकीक होता. या कंपनीच्या माध्यमातून जगभरामध्ये औषध निर्यात केली जात होती. मात्र, सरकारचे उदासीन धोरण आणि औषध निर्मितीतील प्रचंड स्पर्धा यामुळे कंपनी डबघाईला आली. केंद्र सरकारचा उपक्रम असल्यामुळे कामगारांचे डोळे केंद्र सरकारकडे लागले.

२०१४ पासून केंद्रात भाजपाची सत्ता आहे. यापूर्वी, काँग्रेसचे मोहन धारिया, प्रा. रामकृष्ण मोरे, विदुरा नवले, राष्ट्रवादीचे खासदार शरद पवार, सुप्रिया सुळे यांनीही एच.ए. मजदूर संघाचे नेतृत्व केले आहे. त्यानंतर खासदार श्रीरंग बारणे आणि मनोज कोठक यांच्या नेतृत्वातही कामगारांचे प्रश्न सुटलेले नाहीत.








### कंपनीच्या पुनरुज्जीवनासाठी उपाययोजनांची गरज...

पिंपरी-चिंचवडमध्ये उद्योगाची मुहूर्तमेढ रोवणारी कंपनी म्हणून ‘हिंदुस्थान अँटिबायोटिक्स’चे (एच. ए.) नाव घेतले जाते. त्यानंतर अनेक नामवंत उद्योगसमूहांनी येथे युनिट्स स्थापन केली. त्यामुळे या शहराला औद्योगिकनगरीचे बिरुद लाभले. मात्र, गेल्या काही वर्षांपासून औषधनिर्मिती करणारी ‘एचए’ आजारी पडली आहे. तिला गरज आहे आर्थिक सलाइनची आणि पुनरुज्जीवनासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी हस्ते १९५६मध्ये उद्घाटन झाल्यानंतर कंपनीत औषधनिर्मिती सुरू झाली. स्थैर्य प्राप्त झाल्यानंतर १९६० ते १९८० ही दोन दशके कंपनीची गौरवाची ठरली. याच काळात कंपनीने उत्कृष्ट परफॉर्मन्स दाखवल्याबद्दल अनेक पारितोषिके मिळवली. संशोधन आणि नवनिर्मितीच्या बाबतीतही कंपनीने चांगली कामगिरी बजावली. पण, पेनिसिलिनचे उत्पादन बंद झाल्यानंतर हा उद्योग अडचणीत आला.



“ एच.ए. कंपनीला आजारी उद्योग म्हणून विशेष पॅकेज’ केंद्र सरकारने दिले पाहिजे. औद्योगिकनगरी, कामगार नगरीचा पाया या कंपनीमुळे रचला आहे. पण, केंद्र सरकारच्या कामगारविरोधी धोरणामुळे कंपनी तोट्यात आणि कामगार देशोधडीला लागल्याची स्थिती आहे. विद्यमान खासदार यांनी कामगारांना केवळ आश्वासने दिली आणि दिशाभूल केली आहे. कंपनीमध्ये पेनिसिलिन प्लांट, जेन्टमाथासीन प्लांट, आय. व्ही. प्लांट तसेच अन्य इतर प्लांट सुरू करून उत्पादन करण्याबाबत दिलेले प्रस्ताव खासदारांना केंद्राकडे मांडताच आले नाहीत. कंपनी दिवसेंदिवस अधोगतीकडे निघाली असून, अनागोंदी कारभार आहे. औषध उत्पादन सोडून भलतेच उद्योग सुरू आहेत. कंपनीच्या जागेवर लग्नसमारंभ कार्यालय, पेट्रोल करीता जमिनी भाड्याने देणे असे प्रकार सुरू असताना या भागातील लोकप्रतिनिधी, खासदार मूग गिळून कानाडोळा करीत आहेत. कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांविषयी सहानुभूती नसलेले लोकप्रतिनिधी काय कामाचे आहेत?

**-संजोग वाघेरे, संघटक, शिवसेना उबाठा**

# निवडणूक आयोगाचा राज्य सरकारला दणका!

## सरकारला दणका देत 109 अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या रद्द

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

लोकसभा निवडणुकीची आचारसंहित लागू होण्यापूर्वी सनदी अधिकारी आणि राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. मात्र, अनेक बदल्या करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे नियम, निकष पायदळी तुडविण्यात आल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्या होत्या. तसेच अनेक अधिकाऱ्यांनी मॅटमध्ये धाव घेतली होती. या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दणका देत १०९ अधिकाऱ्यांच्या बदल्या रद्द केल्या आहेत.




बदल्या करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे नियम, निकष यांचे पालन करण्यात आले नसल्याच्या तक्रारी आयोगाकडे दाखल झाल्या होत्या. तसेच अनेक पोलीस अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणाकडे (मॅट) धाव घेतली होती. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, 'लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्या करताना नियम, निकषांचे पालन न केल्याने अनेक अधिकारी मॅटमध्ये गेले होते. याबाबत मॅटने केंद्रीय निवडणूक आयोगाला निवडणुकीच्या अनुषंगाने बदली करतानाचे नियम, निकष तपासून पाहण्याची विनंती केली होती. अशी २२५ प्रकरणे आयोगाकडे दाखल झाली होती. या प्रकरणांची छाननी केल्यानंतर १०९ बदल्या नियम, निकषानुसार झाल्या नसल्याचे निदर्शनास आले. ही बाब मॅट आणि राज्य शासनाला कळविण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकरणांत नियमाप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे.'पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी सुहास दिवसे यांची ७ फेब्रुवारीला नियुक्ती करण्यात आली. मात्र, गेल्या चार वर्षांपासून दिवसे हे पुण्यात महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. निवडणूक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांसाठी ठरवून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्याचा दावा करत डॉ. दिवसे यांची बदली रद्द करावी, अशी मागणी आम आदमी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष, सुराज्य संघर्ष समितीचे विजय कुंभार यांनी आयोगाकडे केली होती. त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाने खुलासा केला आहे. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांचे निकष ठरवून दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यात तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्हाबाहेर बदली करावी, असे सांगण्यात आले आहे. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ जिल्ह्यात झाला असेल, मात्र संबंधित अधिकारी निवडणुकीशी संबंधित काम करणार नसेल, तर तो जिल्ह्यात राहू शकतो. मात्र, भविष्यात अशा अधिकाऱ्याकडे निवडणुकीशी संबंधित काम देण्यात येऊ नये, अशी अट आयोगाने घातली आहे.दिवसे हे जुलै २०२० ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त होते. त्यानंतर सप्टेंबर २०२२ ते ७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पुण्यात राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून दिवसे यांची नियुक्ती झाली होती. ७ फेब्रुवारीला पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ जिल्ह्यात असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्हाबाहेर बदली करण्यात यावी, असा निवडणूक आयोगाचा नियम आहे. दिवसे यांच्या बदलीने या नियमाचा भंग झाला आहे किंवा निवडणूक आयोगाचा नियम डावलून दिवसे यांची नियुक्ती करण्यात आल्याचा आरोप कुंभार यांनी केला होता.

### निवडणूक आयोगाकडे तक्रार


याबाबत खुलासा करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे म्हणाले, 'डॉ. दिवसे हे राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून कार्यरत होते. हे पद राज्यस्तरावरील असून मुख्यालय पुण्यात असले, तरी कार्यक्षेत्र राज्य होते. त्यामुळे डॉ. दिवसे यांचे कार्यक्षेत्र पुणे जिल्हा असे गणले जात नव्हते. त्यामुळे त्यांची नियमाप्रमाणे जिल्हाधिकारीपदी नियुक्ती झाली आहे.'लोकसभा निवडणुकीची आचारसंहित लागू होण्यापूर्वी सनदी अधिकारी आणि राज्य पोलीस दलातील अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात येत आहेत. मात्र, अनेक बदल्या करताना केंद्रीय निवडणूक आयोगाचे नियम, निकष पायदळी तुडविण्यात आल्याच्या तक्रारी होत आहेत. याबाबत निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आल्या होत्या.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत कामगार कंत्राटीकरणात गैरव्यवहार?

## वेतन खर्चात 3 पटींनी वाढ : हनुमंत लांडगे यांची चौकशीची मागणी

।
पिंपरी ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

महापालिका प्रशासकीय काळात कंत्राटीकरणाचा आणि कंत्राटदाराच्या आर्थिक गैरव्यवहाराचा सुळसुळाट झाल्याने, दोन वर्षात वेतनावरील खर्चात 3 पट वाढ झाली, असून त्याची चौकशी करावी आणि वेळेत उपाययोजना कराव्यात, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश भारतीय जनता पार्टी कामगार मोर्चाचे प्रदेश संघटन सरचिटणीस हनुमंत लांडगे यांनी केली आहे.



आझादी का अमृत महोत्सव

भाजपा, महाराष्ट्र
कामगार मोर्चा

मा.आ. चंद्रशेखर बावनकुळे
प्रदेशाध्यक्ष, कार्यसमिती

मा. विजय हरगुडे
प्रदेशाध्यक्ष, कामगार मोर्चा

हनुमंत नामदेव लांडगे
प्रदेश सरचिटणीस, कामगार मोर्चा

प्रति,
मा. शेखर सिंह (आयएएस)
महापालिका आयुक्त तथा प्रशासक पिंपरी चिंचवड महानगरपालिका

विषय : प्रशासकीय काळात कंत्राटीकरणाचा आणि कंत्राटदाराच्या आर्थिक गैरव्यवहाराचा सुळसुळाट झाल्याने, दोन वर्षात वेतनावरील खर्चात 3 पट वाढ याबाबत वेळेत उपाययोजना करणेबाबत ...

महोदय,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत 7 हजार 84 कायमस्वरुपी तर कंत्राटी व मानधनावरील 15 हजारापेक्षा जास्त कामगार कार्यरत आहे, तसेच वर्कस कॉन्ट्रॅक्टर मार्फत 10 हजारापेक्षा जास्त कामगार काम करीत आहेत. याशिवाय मनपाचे दायित्व असलेल्या स्मार्ट सिटी लिमिटेड, पुणे मेट्रो, पीएमपीएल या उपक्रमात मध्ये हजारो कंत्राटी व मानधनावरील कामगार कार्यरत आहेत. सन 2022 साली पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कामगारांच्या वेतनावर 365 कोटी खर्च व्हायचा, आता मात्र कंत्राटीकरणाचा सुळसुळाट झाल्याने, दोन वर्षात वेतनावरील खर्चात 3 पटीने म्हणजेच 1251 कोटी इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.
तसेच कंत्राटी, मानधनावरील कामगारांचा पीएफ, ईएसआय, व्यवसायकर इत्यादीचा भरणा दरमहा शासनाकडे होत नसलेने भविष्यात शेकडो करोडचा भुर्दंड महापालिकेस भरावा लागणार आहे. याबाबत आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे की, यापुढे आर्थिक शिस्त न पाळणे आणि कामगाराच्या वेतनातून कपात होणारी रक्कम शासनास दरमहा अदा न करणे याबाबत, तातडीने उपाय योजना न केल्यास महापालिकेस येत्या पाच वर्षांत दिवाळखोरी जाहिर करावी लागेल.
तरी सदरच्या विषयांकित वस्तुस्थितीचा व्यापक विचार व सखोल चौकशी होऊन, तातडीने उपाय योजना व्हावी. हि विनंती.

आपला विश्वासू

23/02/2024

हनुमंत नामदेव लांडगे

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत 7 हजार 84 कायमस्वरुपी, तर कंत्राटी व मानधनावरील 15 हजारापेक्षा जास्त कामगार कार्यरत आहे, तसेच वर्कस कॉन्ट्रॅक्टर मार्फत 10 हजारापेक्षा जास्त कामगार काम करीत आहेत. याशिवाय मनपाचे दायित्व असलेल्या स्मार्ट सिटी लिमिटेड, पुणे मेट्रो, पीएमपीएल या उपक्रमात मध्ये हजारो कंत्राटी व मानधनावरील कामगार कार्यरत आहेत.

सन 2022 साली पिंपरी-चिंचवड महापालिकेचा कामगारांच्या वेतनावर 365 कोटी खर्च व्हायचा, आता मात्र कंत्राटीकरणाचा सुळसुळाट झाल्याने, दोन वर्षात वेतनावरील खर्चात 3 पटीने म्हणजेच 1251 कोटी इतकी वाढ झाल्याचे दिसून येत आहे.

तसेच, कंत्राटी, मानधनावरील कामगारांचा पीएफ, ईएसआय, व्यवसायकर इत्यादीचा भरणा दरमहा शासनाकडे होत नसलेने भविष्यात शेकडो करोडचा भुर्दंड महापालिकेस भरावा लागणार



> महापालिका प्रशासनात कामगार वेतन आणि प्रश्नांबाबत आर्थिक शिस्त न पाळणे आणि कामगाराच्या वेतनातून कपात होणारी रक्कम शासनास दरमहा अदा न करणे याबाबत, तातडीने उपाय योजना न केल्यास महापालिकेस येत्या पाच वर्षांत दिवाळखोरी जाहिर करावी लागेल. त्यामुळे याबाबत वस्तुस्थितीचा व्यापक विचार व सखोल चौकशी होऊन, तातडीने उपाय योजना कराव्यात.
>
> **– हनुमंत लांडगे,** कामगार नेते.

# सत्ता अजितदादांची; हवा रोहीतदादांची!

## महापालिकेत धडक : आयुक्त शेखर सिंह यांचे नव्या दादांना 'रेड कार्पेट'

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पिंपरी चिंचवडच्या बालेकिल्ल्यात आमदार रोहित पवार यांनी देखील सर्जिकल स्ट्राईक केला आहे. आपल्या विचारांचा गट तयार करण्याबरोबर शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी देखील आमदार पवार पाठपुरावा करताना दिसत आहेत. या पूर्वी भाजपाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गडाला सुरुंग लावत महापालिका ताब्यात घेण्याचे काम केले आहे. आता आमदार रोहित पवार देखील उपमुख्यमंत्री पवार यांना शह देण्यासाठी शहरात उतरले असल्याने राजकीय रंगत पहायला मिळत आहे.**





उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा शहरात मोठा जनसंपर्क आणि दरारा आहे. राष्ट्रवादीच्या फुटीनंतर सर्वच माजी नगरसेवक, आमदार आणि पदाधिकारी त्यांच्या हातात हात घालून पुढे राजकीय वाटचाल करत आहेत. यावरून शहराच्या राजकारणात मोठ्या साहेबांचा न्हवे तर अजित दादांचाच बोलबाला असल्याचा संदेश दाखविण्याचा प्रयत्न अजित दादा समर्थकांनी केला. मात्र खासदार शरदचंद्र पवार यांची राष्ट्रवादी टक्कर देण्यासाठी सज्ज असल्याचे आव्हान आमदार रोहित पवार यांनी दिले. शहराध्यक्ष पदावर तुषार कामठे यांची नियुक्ती करण्यात आमदार रोहित पवार यांनीच पुढाकार घेतल्याची चर्चा आहे. एका बाजूला आपल्या विचारांचे समर्थक निर्माण करण्याबरोबरच दुसरीकडे आपल्या टीकेतून शहरातील प्रस्थापित अजित दादा समर्थक नेत्यांना घायाळ करण्याची खेळी देखील आमदार रोहित पवार करत आहेत. शहरातील सामाजिक कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेणे, तरुणांना भेटणे, विविध कार्यक्रमांना हजेरी लावण्यावर रोहित पवारांचा भर दिसत आहे. केवळ एवढ्यावरच चालणार नसून शहरातील विकासकामांवर बोलावे लागेल यायची जाण असल्याने रोहित पवारांनी आयुक्तांची भेट घेऊन शहरातील प्रश्न मार्गी लावण्याबाबत पुढाकार घेतला आहे. त्याला आयुक्त शेखर सिंह यांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याने राजकीय चर्चांना निमित्त भेटले आहे.

### आमदार बनसोडे यांची मध्यस्थी फलदायी पण...

» वाकड येथील टीडीआर प्रकरणानंतर आयुक्त सिंह यांच्या बदलीचा विषय रंगला होता. दरम्यानच्या काळात आयुक्त सिंह यांनी उपमुख्यमंत्री अजित दादांच्या गटाशी जुळवून घेतले. त्यांची बदली थांबविण्यासाठी पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांची मध्यस्थी फलदायी ठरल्याचे सांगण्यात येत आहे. त्यावरून सध्या आयुक्त शेखर सिंह यांची बदली होणार नसून ते आपला कार्यकाळ पूर्ण करतील, हे स्पषट आहे. त्यामुळे त्यांच्या मार्फत आपली कामे होतील अशी अपेक्षा अजित दादा समर्थकांना आहे. मात्र दुसरीकडे आयुक्तांचा आमदार रोहित पवार यांच्याबाबतचा पॉझिटिव्ह ॲप्रोच देखील अजित दादा समर्थकांची डोकेदुखी वाढवणारी ठरत आहे.

### आमदार रोहित पवारांसाठी आयुक्तांच्या पायघड्या

»विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी नुकताच पिंपरी चिंचवड शहरात जनता दरबार आयोजित केला होता. महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी जनतेच्या प्रश्नांवर चर्चा करण्याचे त्यांचे नियोजन होते. मात्र महापालिकेच्या सभागृहात हा कार्यक्रम घ्यायला महापालिकेने नकारघंटा दिली. मात्र दुसरीकडे आमदार रोहित पवार यांना पायघड्या घातल्याचे दिसले. आमदार पवार यांनी जनतेच्या प्रश्नावर आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेऊन चर्चा केली. रखडलेली विकासकामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या. यावर आयुक्तांनी देखील सकारात्मक उत्तरे दिल्याची चर्चा रंगली होती.

---

# राष्ट्रवादी शरद पवार गटाचा पिंपरी-चिंचवडमध्ये आनंदोत्सव!

## विजयाची तुतारी : चिन्हामुळे संघटनेचे अस्थित्व संपत नाही- तुषार कामठे

। पिंपरी चिंचवड ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांना तुतारी हे निवडणूक चिन्ह जाहीर झाल्याने पिंपरी चिंचवड शहर कार्यकारिणी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने आज पिंपरी येथे मध्यवर्ती कार्यालयात आनंद उत्सव साजरा करण्यात आला. आनंद उत्सवाची सुरुवात एचए कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी अभिवादन करून करण्यात आली. त्यानंतर पदाधिकाऱ्यांनी एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला तसेच कार्यकर्त्यांनी फटाके फोडून मोठ्या जल्लोषामध्ये शुभेछा दिल्या.**



सर्व पदाधिकाऱ्यांनी फेटे बांधून तुतारी या चिन्हाबद्दल आनंद व्यक्त केला. यावेळी तुतारीवादकांच्या च्या निनादामध्ये आणि आदरणीय शरद पवार साहेबांच्या जयघोषाने पिंपरी चौक परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. कार्यक्रमात विविध क्षेत्रातील मान्यवर, तरुण तरुणी, ज्येष्ठ नागरिक व महिला भगिनींनी उत्स्फूर्तपणे हजेरी लावली. "आता निनादणार विजयाच्या 'तुतारी', याच हाताने पेटविणार धगधगत्या 'मशाली', महाराष्ट्रात येणार 'महाविकास' आघाडी..!" असा नारा देत कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी आनंद उत्सवात जल्लोष केला. माजी नगरसेविका सुलक्षणा शिलवंत यांनी यावेळी तुतारी चिन्ह भेटल्याबद्दल आनंद व्यक्त केला व साक्षात छत्रपती शिवरायांचा हा आशीर्वाद असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली, तुतारी हे मंगलवाद्य महाराष्ट्राच्या प्रत्येक मंगल कार्यात वाजविले जाते.. ते विजयाचे व शौर्याचे प्रतीक आहे. असे चिन्ह मिळाल्याने पिंपरी चिंचवड शहरातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे असे सुलक्षणा शिलवंत यांनी सांगितले. आयोजित आनंद उत्सवात उपाध्यक्ष विनोद धुमाळ, कार्याध्यक्ष देवेंद्र तायडे, सेवादल अध्यक्ष अरुण थोपटे अल्पसंख्य अध्यक्ष अल्ताफ भाई शेख सामाजिक न्याय मयूर जाधव व्यापार विभाग विजय पिरांगुटे वरिष्ठ अध्यक्ष काशिनाथ जगताप, विवेक विधाते, काशिनाथ बामणे, शोभा साठे, संदीप गायकवाड, जयंत शिंदे, सुशांत खुरासने, योगेश सोनवणे, विजय बाबर, राजू खंडागळे, के. डी. वाघमारे, विशाल जाधव, रोहित जाधव, अर्जुन कदम, बाळसाहेब शिंदे, गणेश भोंडवे, विनायक शिंदे, गणेश काळे, राजरत्न शिलवंत, संतोष माळी, सागर चिंचवडे, योगेश सोनवणे, अनिल भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

### तुतारी जनसामान्यांच्या मनावर राज्य करेल : कामठे

» यावेळी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे पिंपरी चिंचवड शहराध्यक्ष तुषार कामठे म्हणाले कि, आम्ही ज्यांच्या मार्गदर्शनात काम करतो त्या माननीय शरद पवार साहेबांनी आयुष्याच्या ५७ वर्षांच्या सक्रिय राजकीय कारकिर्दीत पक्षाचे चिन्ह गेल्याची कधी पर्वा केली नाही. त्यांनी आत्तापर्यंत 14 निवडणुका लढल्या, पैकी पाच निवडणुका अशा होत्या की यामध्ये चिन्ह वेगवेगळी होती. एका निवडणुकीत बैल जोडी नंतर गाई वासरू नंतर चरखा, हात आणि मग घड्याळ या वेगवेगळी चिन्हे राज्यात आणि देशात साहेबांनी पाहिली व अनुभवली आहेत, त्यामुळे कोणाला असं वाटत असेल की ती एकदा संघटनेचे चिन्ह आपण काढून घेतले तर त्या संघटनेचे अस्तित्व संपेल असं कधी होत नसते. त्याचबरोबर सकारात्मक बाब म्हणजे महाराष्ट्राच्या मातीशी, इथल्या परंपरेशी ऐतिहासिक नाळ जोडलेले मंगलवाद्य असणारी तुतारी हे चिन्ह मिळाल्याने जनतेपर्यंत चिन्ह पोचविण्यास जास्त वेळ लागणार नाही. स्वाभिमानी राष्ट्रवादीची हि तुतारी जनसामान्यांच्या मनावर राज्य करेल हि खात्री आहे"




# गळपट्टा घातला, तरी हत्ती गायब!

**केरळात हत्तींचा अलीकडला उच्छाद आणि त्यावर 'कायदे बदला' अशी मागणी यांचेही असेच आहे... मुळात कायदा लोकाभिमुख होताच, त्याचे पुढे काय झाले, याची ही कथा... तिच्यातून लोकशाहीचा बोध कोण घेणार, या प्रश्नचिन्हानेच संपणारी...**

दहा फेब्रुवारीला केरळातील वायनाड जिल्ह्यातील मानंतवाडी नगरीत एका हत्तीने रस्त्यात चालणाऱ्या अजीश या शेतमजुरावर हल्ला करून त्याला चिरडून टाकले. हत्तींचे हल्ले होतच असतात, त्यामुळे मानंतवाडीतले लोक या हत्तीवर नजर ठेवून होते, काळजी घेण्याचा प्रयत्नही करत होते. वनविभागाने या हत्तीच्या गळ्यात पाच ते आठ लाख रुपये खर्च करून एक रेडिओ कॉलर घातलेली होती. अपेक्षा होती की कॉलरवरून संदेश येत राहतील आणि हत्तीवर अधिकृत पाळत ठेवली जाईल. पण वनविभाग सांगतो की त्यांना रेडिओ संदेश मिळेनासा झाला होता. म्हणजे हा सगळा आकाशमार्गी उपद्व्याप निष्फळच? याउप्पर कदाचित याचा उफराटा परिणाम होउन गुंगी आणून रेडिओ कॉलर लावलेला हत्ती माणसावर हल्ला करायला आणखीच उद्युक्त झाला होता.हत्तींबाबत नाही, पण हत्तींसारख्याच समाजप्रिय अशा चितळ या पशूच्या संदर्भात मला गुंगी आणून रेडिओ कॉलर लावण्याचा अनुभव आहे. कर्नाटकातल्या बाणेरघट्टा



अभयारण्यात एका कुंपणबंद आवारात चितळ हरणांचा एक कळप ठेवला आहे. सर्वच समाजप्रिय पशूंच्या कळपांत नरांच्यात समाजाच्या उतरंडीत वरच्या पायरीवर चढण्याची स्पर्धा चालू असते. कोण वरचढ हे ठरवण्यासाठी दोन नर डोक्याला डोके रोवून प्रतिस्पर्ध्याला मागे ढकलू पाहतात. काही वेळाने त्यांच्यातील एक आपण कमकुवत आहोत हे मानतो आणि झुंज थांबवतो. गुंगी आणून रेडिओ कॉलर लावण्याच्या प्रयोगात मी सहभागी होतो. त्या कळपातला सगळ्यात मोठी शिंगे असलेला नर आपण सर्वश्रेष्ठ आहोत असे दाखवत मिरवत होता. गुंगी आणण्याचे इंजेक्शन देण्याची सिरिंज बंदुकीतून, बरोबर या मिरवणाऱ्या नराला लागली. तो बिचकला, मग गुंगी चढल्यावर लटपटू लागला, पडला. आम्ही जाऊन त्याच्या गळ्यात रेडिओ कॉलर घातली आणि पाहात राहिलो. तासाभरात तो पुन्हा लटपटत उभा राहिला. तत्क्षणी दुसरा बहुधा त्या कळपातला दोन क्रमांकावरचा नर धावला आणि आता कमकुवत झालेल्या त्या नराला त्याने आव्हान दिले. रेटारेटीत तो प्रतिस्पर्धी सहजच जिंकला. मग दुसरेही आणखी खालच्या पायरीवरचे नर धावले आणि त्या बिचाऱ्या पूर्वीच्या वरिष्ठ नराला आव्हान देऊ लागले. हे बराच वेळ चालू राहिले, स्पष्ट दिसत होते की आता तो आधीचा बलिष्ठ नर या अनुभवाने नक्कीच चिडका बनला असणार. गुंगी आणून रेडिओ कॉलर लावलेल्या हत्तींच्यातसुद्धा अशी चिडकी प्रवृत्ती येऊन ते माणसावर हल्ला करण्यास अधिकच प्रवृत्त होत असणार.१४ फेब्रुवारीला केरळ विधानसभेत झालेल्या चर्चेत विरोधी पक्षाच्या आमदारांनी आरोप केले की त्या राज्यात अलीकडे वन्य प्राण्यांच्या हल्ल्यातून निदान ५० लाख रु.च्या मालमत्तेचा विध्वंस झाला आहे आणि अनेक माणसांच, गुरांचे मृत्यू झालेले आहेत. देशभरच वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे प्रचंड हानी सुरू आहे आणि अधिकृत यंत्रणेकडून याचा काहीही हिशेब ठेवला जात नाही, परंतु डॉक्टर सुकुमारांनी काळजीपूर्वक गोळा केलेल्या माहितीप्रमाणे गेल्या ४० वर्षांत हत्तींची संख्या निदान दुप्पट वाढली आहे. दरवर्षी ५०० लोक हत्तींच्या पायदळी चिरडले जाताहेत. देशभर हे मुकाट सहन केले जाते, पण आता केरळातील जनतेने ठरवले की हे फार झाले. त्यांच्या आंदोलनामुळे- आणि आता निवडणूक जवळ आल्याने- काहीतरी लोकाभिमुख निर्णय घेणे भाग आहे म्हणून केरळ विधानसभेने एकमताने वन्य प्राणी संरक्षण कायदा बदलायलाच पाहिजे असा ठराव मंजूर केला आहे.हा सगळा "वृक्ष, वेली, पशू, पाखरे आम्हा सोयरी वनचरे" मानणाऱ्या भारतीय परंपरेला झुगारून देण्याचा परिपाक आहे. इंग्रज भारतात शिरले, स्थिरावले तेव्हा वनचरांची रेलचेल असणारा वृक्षाचा महासागर असे भारतभूचे वर्णन केले जात होते. ही सगळी निसर्ग संपत्ती लुबाडून घेण्यासाठी जेत्यांनी वैज्ञानिक वनव्यवस्थापनाचे ढोंग करत वनविभाग प्रस्थापित केला.

## संपादकीय »

### राजकारणातले 'सर'

*मनोहर जोशी यांचा आठ-नऊ दशकांचा जीवनप्रवास हा एका अर्थाने अडथळ्यांची शर्यतच होता.*

मनोहर जोशी यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकारणाला एक नवी शैली बहाल करणाऱ्या शिवसेनेच्या गेल्या सहा-साडेसहा दशकांच्या इतिहासातील एक महत्त्वाचा दुवा निखळला आहे. खरे तर जोशी 'सरां'चा अवघा जीवनप्रवास हा बॉलीवूडच्या एखाद्या 'सक्सेस स्टोरी'ची पटकथाच होऊ शकतो. अठरा विश्वे दारिद्र्यामुळे माधुकरी मागून शालेय शिक्षण पूर्ण करणारा हा युवक जिद्द मनाशी बाळगून मुंबईत येतो काय, तिथे कोणाच्या तरी गॅलरीत झोपून दिवस काढत, मुंबई महापालिकेत लिपिक म्हणून नोकरी मिळवतो काय आणि पुढे थेट याच मायावी मुंबईचा महापौरच नव्हे तर राज्याचा मुख्यमंत्री आणि लोकसभाअध्यक्ष होतो काय, हे सारेच चित्तथरारक आणि तरुणांना प्रेरणा देणारे आहे.त्यांचा आठ-नऊ दशकांचा जीवनप्रवास हा अडथळ्यांची शर्यतच होता. बाळासाहेब ठाकरे यांच्याशी त्यांचा ऋणानुबंध जुळणे, हा त्यातला सर्वांत 'सुखद अपघात' होता.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यानंतर मध्य प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनीही काँग्रेसच्या बुडत्या जहाजातून बाहेर पडून भाजप-प्रवेशासाठी मोर्चेबांधणी सुरू केली आहे. अधिक किफायतशीर राजकीय भविष्याच्या शोधात भाजपवासी झालेल्या काँग्रेसजनांची संख्या अधिक असेल.

# निवडणुकीआधीच तरारलेले 'ऑपरेशन कमळ'

कमलनाथ यांनी अलीकडेच मध्य प्रदेशात झालेल्या विधानसभा निवडणुकीत इतका अहंकार दाखवला की, ते राज्य अगदी अनायासे भाजपच्या ताब्यात गेले. मतदारांच्या पसंतींचा स्वकेंद्रित, चुकीचा अर्थ आणि अन्य चुकीच्या हाताळणीमुळे अखिलेश यादव यांच्या नेतृत्वाखालील समाजवादी पक्षासारखे पक्ष मध्य प्रदेशात काँग्रेसला मदत करेनासे झाले. निवडणूक काँग्रेसला सोपी नाही, हे उघड असताना असे अहंकारी वर्तन परवडणारे नाही, हेच मग मतदारांनी दाखवून दिले.अशोक चव्हाण यांचे महाराष्ट्राच्या राजकारणातील स्थान घसरते आहे, हे स्पष्टपणे दिसत होते. २०१९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी लढवून पाहिली, पण त्यात नांदेडची जागा त्यांनी भाजपच्या प्रताप चिखलीकर यांच्याकडून गमावली होती. अशोक चव्हाण यांचे वडील शंकरराव चव्हाण हे एक अत्यंत प्रतिष्ठित राजकारणी होते. शंकररावांना राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची आणि



केंद्रीय गृहमंत्रिपदाची खुर्चीही शोभली होती. शंकररावांना भ्रष्टाचाराबद्दल चीड होती. तो वारसा मुलाने पाळला नाही, हेही दिसले.आता याच अशोक चव्हाणांना त्यांच्या नव्या मित्रांकडून राज्यसभेवर पाठवण्यात येणार आहे. मग केंद्रात मंत्रीपद मिळवण्यासाठी अशोक चव्हाणांना, महाराष्ट्रातून पक्षांतर करूनच भाजपवासी झालेल्या नारायण राणे यांच्यासारख्यांशी स्पर्धा करावी लागेल. भाजपमध्ये येण्यापूर्वी राणे यांच्यावरही तपासयंत्रणाची करडी नजर होती, ही झाली काही वर्षांपूर्वीची गोष्ट.सत्ता गमावलेल्या पक्षामधून रया गेलेल्या नेत्यांचे स्थलांतर सत्ताधारी पक्षात होण्याचा वेग नेमका लोकसभा निवडणूक जवळ येत असताना वाढला आहे. इतका की, भाजपचे देशाला 'काँग्रेस-मुक्त' करण्याचे धोरण हे 'विरोधी पक्ष मुक्त' देशाकडे तर नेणार नाही ना, असा प्रश्न कुणाला पडावा. पक्षांतर कोणीही करते आहे. जे धुतल्या तांदळासारखे नाहीत ते तर जाताहेतच, पण एवढ्या मोठ्या सत्तेचा एखादा पद-लाभ आपल्यालाही होईल यासाठी आशाळभूत झालेले, किंवा निव्वळ बड्या पक्षातच राहावे अशा विचाराने आलेले असे साऱ्याच प्रकारचे हे पक्षांतरित आहेत. लोभ हाच या साऱ्यांना इथवर घेऊन आलेला सारथी. आणि एकदा का ते इथवर- म्हणजे भाजपच्या दाराशी आले की, आमची दारे कशी उघडीच आहेत आणि आमच्या या दारांतून आत येणारेच अधिक आहेत, हे सांगण्यास भाजप उत्सुकच असल्याचेही वारंवार दिसते आहेच.या पार्श्वभूमीवर, अलीकडेच आम आदमी पक्ष ('आप') व काँग्रेसच्या युतीला चंडीगड महापालिकेत ३६ पैकी २० जागा असल्याने बहुमताची खात्री असूनसुद्धा काय झाले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मनोहर जोशी अनंतात विलीन!

## मुख्यमंत्रिपदी असताना एक रुपयात झुणका-भाकर ही त्यांची योजना

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेनेच्या राजकीय वाटचालीत महापौर ते लोकसभा अध्यक्षपद अशी विविध महत्त्वाची पदे भूषविलेले माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी (८६) यांचे शुक्रवारी पहाटे प्रदीर्घ आजाराने एका खासगी रुग्णालयात निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. जोशी यांच्या पार्थिवावर शिवाजी पार्क स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.**



शिवसेनेचा 'कोहिनूर हिरा' हरपला अशीच सार्वत्रिक भावना त्यांच्या निधनानंतर व्यक्त झाली. शिवसेनेत 'सर' या बिरुदाने प्रसिद्ध असलेले मनोहर जोशी गेल्या मे महिन्यापासून आजारी होते. बुधवारी रात्री त्यांना हृदयविकाराचा झटका आल्याने माहीममधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. गुरुवारी सायंकाळनंतर त्यांची प्रकृती खालावत गेली आणि शुक्रवारी पहाटे त्यांची प्राणज्योत मालवली. मुंबई महानगरपालिकेत नगरसेवक, महापौर, विधानसभा आणि विधान परिषदेची आमदारकी, विधानसभेचे विरोधी पक्षनेते, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष असा चढत्या क्रमाने त्यांचा राजकीय प्रवास झाला. रायगड जिल्ह्यातील नांदवी येथे जन्मलेल्या मनोहर जोशी यांनी लहानपणी गरिबी अनुभवली. त्यांनी भिक्षुकी करून शिक्षण घेतले. त्यांच्याकडे शिकण्याची जिद्द प्रचंड होती. प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत त्यांनी एम. ए, एल. एल. बी.पर्यंत शिक्षण घेतले. १९६०च्या दशकात मुंबई महापालिकेत लिपिकाची नोकरी त्यांनी पत्करली. याच काळात त्यांनी कोहिनूर क्लासेसची स्थापना केली. बाळासाहेब ठाकरे यांच्या वक्तृत्वाने प्रभावित होऊन त्यांनी १९६७मध्ये शिवसेनेत प्रवेश केला. ज्या मुंबई महापालिकेत लिपिक म्हणून नोकरी केली त्याच महापालिकेत ते नगरसेवक म्हणून निवडून आले. त्यांनी १९७६-७७ मध्ये महापौरपद भूषवले होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा विश्वास संपादन केलेल्या जोशी यांनी कधीच मागे वळून पाहिले नाही. महापौरपद, आमदारकी अशा चढत्या क्रमाने त्यांची राजकीय वाटचाल झाली. विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर मुंबईचे विविध प्रश्न त्यांनी सभागृहात मांडले होते. मुख्यमंत्रिपदी असताना एक रुपयात झुणका-भाकर ही त्यांची योजना चांगलीच गाजली होती. मुंबई आणि नागपूरमध्ये महापौर परिषद, शहरांच्या विकासासाठी विशेष निधी त्यांनी उपलब्ध करून दिला होता. मुंबईतील ५५ उड्डाण पूल, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग असे विविध प्रकल्प नितीन गडकरी यांनी राबविले असले तरी ते मनोहर जोशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात मार्गी लागले होते. 'बॉम्बे'चे मुंबई करण्याचा निर्णय जोशी यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात झाला होता. तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांच्याशी उडणारे खटके, ५५ अपक्ष आमदारांचा पाठिंबा महत्त्वाचा असल्याने त्यांना चुचकारण्याबरोबरच 'मातोश्री'ची मर्जी राखताना जोशी यांना पावणेचार वर्षांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात तारेवरची कसरत करावी लागली होती. मनोहर जोशी यांनी १९९०च्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे भाऊराव पाटील यांचा दादर मतदारसंघात पराभव केला होता. धार्मिक आधावर ही निवडणूक लढविण्यात आल्याचा आक्षेप पाटील यांनी घेतला होता. जोशी यांनी धार्मिक प्रचार करून भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचा मुद्दा पाटील यांनी मांडला होता. भ्रष्ट मार्गाचा अवलंब केल्याचा ठपका ठेवत तत्कालीन न्यायमूर्ती वरियावा यांनी मनोहर जोशी यांची आमदारकी रद्द केली होती.

> मनोहर जोशीजी यांच्या निधनाने व्यथित झालो आहे. ते एक जुनेजाणते नेते होते, ज्यांनी आपल्या आयुष्यातील अनेक वर्षे सार्वजनिक सेवेसाठी व्यतीत केली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून जोशी यांनी राज्याच्या प्रगतीकरता अथक प्रयत्न केले. तसेच केंद्रीय मंत्री म्हणून देखील त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. लोकसभा अध्यक्षपदाच्या काळात जोशी यांनी संसदेचे कामकाज अधिक गतिमान आणि सर्वसमावेशक करण्यासाठी प्रयत्न केले. चारही विधानमंडळांमध्ये काम करण्याचा बहुमान लाभलेले मनोहर जोशी त्यांच्या व्यासंगाबद्दल स्मरणात राहतील.
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

> शिक्षणातील 'सर' ते लोकसभा अध्यक्ष म्हणून 'स्पीकर सर' अशी कारकीर्द असणाऱ्या महाराष्ट्राच्या सुपुत्राला काळाने आपल्यातून हिरावून घेतले आहे. शिवसेनेचा कोहिनूर हिरा हरपला आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचे ते सच्चे पाईक होते. राजकीय तसेच संसदीय लोकशाही प्रणालीवर गाढा विश्वास असणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. विकासाची चौफेर दृष्टी असलेल्या एका सुसंस्कृत, व्यासंगी नेत्याला महाराष्ट्र मुकला आहे.
>
> **– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

# भाजपाच्या ९० टक्के कार्यकर्त्यांना काहीच मिळणार नाही

## काँग्रेसतून भाजपामध्ये प्रवेश करणाऱ्याना राज्यसभा किंवा इतर पदे

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजकारणात काम करत असताना प्रत्येक व्यक्तीला आपल्या भवितव्याची चिंता असते. काँग्रेसच्या नेत्यांना त्यांच्या भवितव्याबाबत अंधार दिसतो. त्यांच्यासमोर भविष्याबाबत मोठं प्रश्नचिन्ह आहे.**

काँग्रेसचे श्रेष्ठी पराभवापासून काही शिकताना दिसत नाहीत. त्यामुळे काँग्रेसचे अनेक नेते पंतप्रधान मोदींच्या कामामुळे प्रभावित झालेले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या विकासाच्या कामाचा झंझावात पाहून इतर पक्षातील अनेक नेत्यांना भाजपाबरोबर येऊन काम करण्याची इच्छा निर्माण झालेली आहे. अशोक चव्हाण असतील किंवा इतर राज्यातील काही नेते असतील, ते सर्व मुख्य प्रवाहात येऊन काम करण्यास इच्छुक आहेत. असे जे नेते भाजपात प्रवेश करत आहेत, त्यांना आम्ही सामावून घेत आहोत", अशी भूमिका राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली. काँग्रेस आणि इतर पक्षातून आलेल्या नेत्यांना पद, प्रतिष्ठा मिळत असताना भाजपाच्या मूळ निष्ठावान कार्यकर्त्यांना जमिनीवर केवळ संघर्षच करावा लागणार का? असा प्रश्न मुलाखतीत फडणवीस यांना विचारण्यात आला. त्यावर फडणवीस म्हणाले, "भाजपाचा कार्यकर्ता हाच भाजपाचा आधार आहे. तोच भाजपाची खरी ताकद आहे. भाजपाच्या ९० टक्के कार्यकर्त्यांना माहिती आहे की, त्यांना जीवनात काहीही अक्षरशः काहीही मिळणार नाही. ते आमदार बनणार नाहीत किंवा लोकप्रतिनिधी होणार नाहीत. कारण लोकप्रतिनिधींची संख्या मर्यादीत आहे. तरीही भाजपाचा कार्यकर्ता काम करत राहतो. कारण त्याची काम करण्याची प्रेरणा सत्ता नसून विचार आहे. या कार्यकर्त्यांच्या बळावरच भाजपा पक्ष पुढे जात आहे." "आज जेव्हा नवीन लोक पक्षात येत आहेत. तेव्हा कार्यकर्ता असे मानतो की, पंतप्रधान नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी पाहण्यासाठी जे करावे लागेल, ते केले पाहीजे. हे करताना भाजपाच्या कार्यकर्त्यांना कोणतेही दुख किंवा चिंता वाटत नाही. कोणत्याही परिस्थितीमध्ये तो काम करण्यासाठी तयार आहे", असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.



### मी 90 टक्के विकासावर बोलतो

» मागच्या निवडणुकीत तुम्ही ज्यांच्या विरोधात बोलला होतात, ते लोक आता तुमच्याबरोबर मंचावर उपस्थित राहणार आहेत. याही वेळेला त्यांच्याच विरोधात बोलू. राहिला प्रश्न आमच्याबरोबर असलेल्या लोकांचा, तरत त्यांचे नेतृत्वही याच दोन नेत्यांनी केले होते. तसेच निवडणुकीच्या प्रचारात मी नकारात्मकतेवर बोलत नाही.

# ‘इंडिया’ आघाडी पुन्हा रुळांवर!

## » तृणमूल काँग्रेसला दोनपेक्षा जास्त जागा देण्याची तयारी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**‘इंडिया’ आघाडीतील फिसकटलेली जागावाटपांची चर्चा पुन्हा रुळावर आली असून उत्तर प्रदेश, दिल्लीनंतर पश्चिम बंगालमध्येही कॉंग्रेस व तृणमूल कॉंग्रेल या दोन्ही घटक पक्षांमध्ये जागावाटपावर मतैक्य होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेसला तृणमूल कॉंग्रेसने फक्त दोन जागा देऊ केल्यामुळे ‘इंडिया’तील कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस व माकपची डावी आघाडी हे तीनही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची चिन्हे दिसू लागली होती. मात्र, कॉंग्रेसने उत्तर प्रदेशमध्ये समाजवादी पक्ष व दिल्लीमध्ये आम आदमी पक्षाशी जागावाटपावर सामंजस्य घडवून आणल्यानंतर पश्चिम बंगालमध्येही तृणमूल कॉंग्रेसने कॉंग्रेसला दोनपेक्षा जास्त जागा देण्याची तयारी दाखवली आहे. कॉंग्रेसने किमान ७-८ जागांची मागणी केली आहे.**





आसाममध्ये १४ जागा तर, मेघालयमध्ये २ जागा असून कॉंग्रेसने ईशान्येकडील या दोन राज्यांमध्ये तृणमूल कॉंग्रेससाठी प्रत्येक एक जागा दिली तर पश्चिम बंगालमध्येही जागावाटपाबाबत तृणमूल कॉंग्रेसकडून तडजोड केली जाण्याची शक्यता आहे. २०१९ मध्ये पश्चिम बंगालमधील ४२ जागांपैकी तृणमूल कॉंग्रेसने २२, भाजपने १८ तर कॉंग्रेसने फक्त २ जागा जिंकल्या होत्या. प्रियंका गांधी-वाड्रा यांनी मध्यस्थी केल्यानंतर उत्तर प्रदेशच्या जागावाटपाचा तिढा सुटला आहे. पश्चिम बंगालमधील जागावाटपाच्या वाटाघाटी मार्गी लावण्यासाठी सोनिया गांधींकडून ममता बॅनर्जीशी संवाद साधला जाऊ शकतो असे मानले जात आहे.कॉंग्रेस व आप यांच्यामध्ये दिल्लीप्रमाणे गुजरातमध्येही आघाडी होणार असली तरी भरुच लोकसभा मतदारसंघावर दोन्ही पक्षांनी दावा केल्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. भरुच जिल्ह्याशी कॉंग्रेसचे दिवंगत नेते अहमद पटेल यांचे पारंपरिक नाते राहिले होते. त्यामुळे या लोकसभा मतदारसंघावर पटेल कुटुंबाने दावा केला असून कॉंग्रेसने हा मतदारसंघ ‘आप’ला देऊ नये अन्यथा आघाडीच्या उमेदवाराला मदत केली जाणार नाही, असा इशारा पटेल यांचे पुत्र फैसल पटेल यांनी दिला आहे. पटेल यांची मुलगी मुमताज पटेल या मतदारसंघातून लढण्यास उत्सुक आहेत. मात्र ‘आप’ने याआधीच चैतर वसावा यांच्या उमेदवारीची घोषणा केली आहे.महाराष्ट्रातही महाविकास आघाडीतील जागावाटपांच्या वाटाघाटी अंतिम टप्प्यात आल्या आहेत.कॉंग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी व शिवसेनेचे (ठाकरे गट) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यामध्ये जागावाटपाबाबत गुरुवारी तासभर चर्चा झाल्याचे समजते. ४८ पैकी ४० जागांवर मतैक्य झाले असून उर्वरित आठ जागांवर लवकरच तोडगा काढला जाईल असे नेत्यांचे म्हणणे आहे. राहुल गांधींनी ‘भारत जोडो न्याय’ यात्रेची अखेर मुंबईत होणार असून त्याआधी महाविकास आघाडीतील जागावाटपावर शिक्कामोर्तब करण्याचा कॉंग्रेसचा प्रयत्न असल्याचे सांगितले जात आहे.आगामी लोकसभा निवडणुकीसाठी जागा वाटपाबाबत जोरदार चर्चा चालू आहेत. इंडिया आघाडी विरुद्ध एनडीए अशी ही लढत रंगणार असल्याने कोणत्या पक्षाला किती जागा मिळतात याकडे सर्वांचं लक्ष आहे. आप आणि कॉंग्रेस हे दोन्ही शत्रू पक्ष इंडिया आघाडीच्या निमित्ताने एकत्र आले आहेत. या दोन्ही पक्षांमध्ये जागा वाटपांवरून प्रचंड मतभेद होते. परंतु, हे मतभेद आता दूर झाले असल्याची शक्यता आहे. कारण, एनडीटीव्हीने दिलेल्या वृत्तानुसार, दिल्ली, गुजरात, गोवा आणि हरियाणामधील जागांसाठी आप आणि कॉंग्रेस यांच्यात जागा वाटपाची गणितं ठरली आहेत.आप नवी दिल्ली व्यतिरिक्त पूर्व, पश्चिम आणि दक्षिण दिल्लीतून उमेदवार उभे करणार आहेत. तर कॉंग्रेस उत्तर-पश्चिम, ईशान्य दिल्ली आणि चंडी चौकमधून निवडणूक लढवेल. दरम्यान, याबाबतची अधिकृत घोषणा इंडिया आघाडीच्या पत्रकार परिषदेत करण्यात येणार आहे. तसंच, गोवा, चंदीगड, गुजरात आणि हरियाणासाठी देखील या दोन्ही पक्षांत जागा वाटप झाल्याचं वृत्त आहे. भाजपाने गेल्या निवडणुकीत गुजरात आणि हरियाणामध्ये बाजी मारली होती.लोकसभेच्या फक्त दोन जागा असलेल्या गोव्यात भाजपाने उत्तर गोवा जिंकला आणि दक्षिण गोव्यात कॉंग्रेसच्या फ्रान्सिस्को सार्डिन्हा १० हजाराच्या फरकाने जिंकले होते. मागच्या निवडणुकीत भाजपाने चंदीगडही काबिज केले होते. या मतदारसंघातून १९९९, २००४ आणि २००९ या तिन्ही वेळा कॉंग्रेसकडून पवन कुमार बन्सल विजयी झाले होते.

### पंजाबमध्ये एकला चलो रे

» ‘इंडिया’ आघाडीतील फिसकटलेली जागावाटपांची चर्चा पुन्हा रुळावर आली असून उत्तर प्रदेश, दिल्लीनंतर पश्चिम बंगालमध्येही कॉंग्रेस व तृणमूल कॉंग्रेल या दोन्ही घटक पक्षांमध्ये जागावाटपावर मतैक्य होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पश्चिम बंगालमध्ये कॉंग्रेसला तृणमूल कॉंग्रेसने फक्त दोन जागा देऊ केल्यामुळे ‘इंडिया’तील कॉंग्रेस, तृणमूल कॉंग्रेस व माकपची डावी आघाडी हे तीनही पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याची चिन्हे दिसू लागली होती. जागा वाटपासाठी इंडिया आघाडीत चर्चा सुरू आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्रासह अनेक राज्यात जागा वाटपाचा निर्णय होणं बाकी आहे. येत्या काही दिवसांत लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. त्याआधीच हा निर्णय होण्याची शक्यता आहे.इतर राज्यात कॉंग्रेस आणि आपने एकत्र येत निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असला तरीही पंजाबमध्ये आप आणि कॉंग्रेस स्वतंत्र निवडणूक लढवणार आहे. आपचे अध्यक्ष अरविंद केजरीवाल यांनी पंजाबमध्ये आपचे १३ उमेदवार उभे करणार असल्याची घोषणा काही दिवसांपूर्वी केली होती.

# वाराणसीत तरुणांना नशेत नाचताना पाहिलं : पंतप्रधान मोदी

## » राहुल गांधीच्या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोरदार प्रत्युत्तर

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“मी वाराणसीत गेलो होतो. रात्रीची वेळ होती. तिथे बाजा वाजताना मी पाहिला. बाजाच्या संगीतावर युपीचं भविष्य रस्त्यात नाचताना मी वाराणसीत बघितलं”, अशी टीका राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.**



आज वाराणसीमध्ये अमूल प्लांट कॉम्प्लेक्समध्ये १३ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या ३५ प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. त्यावेळी ते बोलत होते.पंतप्रधान म्हणाले, “राहुल गांधींनी मोदींना शिव्या देत दोन दशके घालवली, पण आता देवासारखे लोक असलेल्या उत्तर प्रदेशातील तरुणांविरोधात ते बोलत आहेत. जे स्वतः नशेत आहेत ते उत्तर प्रदेश आणि माझ्या काशीच्या मुलांना नशाखोर म्हणत आहेत. अहो अतिपरिवारवादी, काशीचा तरुण उत्तर प्रदेशच्या विकासात व्यस्त आहे, तो आपले समृद्ध भविष्य लिहिण्यासाठी सर्वतोपरी मेहनत करत आहे. इंडिया आघाडीने उत्तर प्रदेशातील तरुणांचा केलेला अपमान कोणीही विसरू शकणार नाही.”मोदी म्हणाले, “हे अतिपरिवारवाद्यांचे वास्तव आहे. कुटुंबातील सदस्यांना नेहमीच युवा शक्तीची भीती वाटते. तरुण प्रतिभांना घाबरतात. सामान्य तरुणाला संधी मिळाली तर ते सर्वत्र आव्हान देतील, असं त्यांना वाटतं. त्यांना तेच लोक आवडतात जे रात्रंदिवस त्यांचा जयजयकार करत असतात. कॉंग्रेस पक्षावर निंदा करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, “परिवारवाद”, भ्रष्टाचार आणि तुष्टीकरणाच्या राजकारणामुळे उत्तर प्रदेश अनेक दशकांपासून विकासात मागे राहिला आहे.”पंतप्रधान म्हणाले, “मोदींचा तिसरा कार्यकाळ हा संपूर्ण जगात भारताच्या सत्तेचा सर्वात महत्त्वाचा काळ असणार आहे.

### भारत आर्थिक महसत्ता बनेल

» यामध्ये भारतातील प्रत्येक आर्थिक, सामाजिक, सामरिक, सांस्कृतिक क्षेत्र नवीन उंची गाठेल. गेल्या दहा वर्षांत भारत ११ व्या क्रमांकावरून पाचवी आर्थिक शक्ती बनला आहे. येत्या पाच वर्षांत भारत जगातील तिसरी सर्वात मोठी आर्थिक महासत्ता बनेल. तसंच, मी हमी दिली आहे की दुर्लक्षित असलेल्या पूर्व भारताला विकसित भारतासाठी प्रगतीचे इंजिन’ बनवतील, असंही ते म्हणाले.“मी वाराणसीत गेलो होतो. रात्रीची वेळ होती. तिथे बाजा वाजताना मी पाहिला. बाजाच्या संगीतावर युपीचं भविष्य रस्त्यात नाचताना मी वाराणसीत बघितलं”, अशी टीका राहुल गांधी यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. या टीकेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे.

# आमिर खाननं घेतली 'दंगल' फेम सुहानीच्या कुटुंबाची भेट

आमिर खानच्या 'दंगल' चित्रपटात छोट्या बबिता फोगाटची भूमिका साकारणाऱ्या सुहानी भटनागरचं अवघ्या १९व्या वर्षी निधन झालं. डरमॅटोमायोसायटिस नावाच्या दुर्मिळ आजाराने १६ फेब्रुवारी २०२३ रोजी तिचा मृत्यू झाला. अभिनेत्रीच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांसह तिच्या चाहत्यांना मोठा धक्का बसला. तसेच तिच्या निधनानंतर अभिनेता आमिर खान याने फरीदाबाद येथील तिच्या कौटुंबिक घरी सुहानीला अंतिम श्रद्धांजली वाहिली. याचा फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.सुहानीच्या आकस्मिक निधनानंतर तिला श्रद्धांजली वाहण्यासाठी आमिर खान सुहानीच्या घरी पोहोचला. व्हायरल झालेल्या फोटोमध्ये सुहानीच्या फोटोच्या बाजूला आमिर खान तिच्या कुटुंबासमवेत दिसत आहे. 'दंगल' या त्यांच्या हिट चित्रपटात सुहानीने आमिरच्या मुलीची भूमिका साकारली होती.दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) येथे डरमॅटोमायोसायटिस या दुर्मिळ आजारावर सुहानीचे उपचार सुरू होते. या आजाराची लक्षणे दोन महिन्यांपूर्वी सुहानीच्या शरीरावर दिसू लागली होती. यात तिच्या डाव्या हाताला सूज येण्यास सुरुवात झाली होती असे सुहानीच्या



आईने सांगितले.सुहानीच्या निधनानंतर एएनआयला दिलेल्या मुलाखतीत, सुहानीची आई पूजा भटनागर यांनी आमिरसह असलेल्या संबंधांविषयी खुलासा केला आणि सांगितले की आमिर खानने त्यांच्या कुटूंबाला आयरा खानच्या लग्नाचे आमंत्रण दिले होते. सुहानीच्या आईने सांगितले, "आमिर सर नेहमी सुहानीच्या संपर्कात राहिले. ते एक चांगले व्यक्ती आहेत. आम्ही त्यांना तिच्या आजाराची माहिती आधी दिली नाही कारण तेव्हा आम्हीच खूप अस्वस्थ होतो. आम्ही ही गोष्ट कोणालाच सांगितली नाही आणि स्वत:जवळ ठेवली. जर सुहानीच्या आजारबद्दल आम्ही आमिर सरांना सांगितले असते तर त्यांनी आम्हाला लगेच संपर्क केला असता. सुहानीच्या पहिल्या भेटीपासूनच आमिर सर आणि सुहानीचा बॉन्ड खूप छान झाला होता. आयराच्या लग्नाचं रितसर आमंत्रणही, त्यांनी आम्हाला दिलं होतं."

## ईशा देओलने शेअर केली पहिली पोस्ट

ईशा देओल बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रींपैकी एक आहे. आपल्या अभिनयाच्या जोरावर ईशाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. सध्या ईशा अभिनयापासून लांब असली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. अभिनयाव्यतिरिक्त ईशा आपल्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत असते.लग्नाच्या ११ वर्षांनंतर ईशा पती भरत तख्तानीबरोबर घटस्फोट घेणार आहे. काही दिवासंपूर्वी दिल्ली टाईम्सला दिलेल्या मुलाखतीत ईशाने याबाबत घोषणा केली होती. ईशाच्या या वक्तव्यानंतर अनेक चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, घटस्फोटाच्या घोषणेनंतर ईशाने पहिल्यांदाच सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.ईशाने इन्स्टाग्रामवर आपला एक फोटो शेअर केला आहे. फोटोमध्ये ईशा कारमध्ये बसल्याचे दिसून येत आहे.

## 'दक्रू'चे पोस्टर प्रदर्शित

अभिनेत्री करीना कपूर खान, क्रिती सेनॉन आणि तब्बू सध्या चांगल्याच चर्चेत आहेत. लवकरच त्यांचा 'द क्रू' (THE CREW) चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. काही दिवसांपूर्वीच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित करण्यात आला. प्रेक्षकांकडून या टीझरला चांगला प्रतिसाद मिळाला. नुकताच या चित्रपटातील करीना, क्रिती आणि तब्बू यांचा लूक समोर आला आहे.'द क्रू' या चित्रपटात करीना , क्रिती व तब्बू एअर होस्टेसच्या भूमिकेत दिसणार आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या लूकमध्ये या तिघी क्रिती लाल रंगाच्या एअर हॉस्टेसच्या पोषाखात दिसत आहेत. करीनाने सोशल मीडियावर तिघींचा हा लूक शेअर केला आहे. फोटोला कॅप्शन देत तिने लिहिले, "चेक-इनसाठी तयार आहात? क्रूसोबत उड्डाण करण्याची वेळ झाली आहे."काही दिवसांपूर्वी या चित्रपटाचा एक टीझर प्रदर्शित करण्यात आला होता. या टीझरच्या बॅकग्राउंडला, 'चोली के पीचे क्या है' हे सुपरहिट गाणे ऐकू येत होते. या चित्रपटाचा टीझर शेअर करताना करीनानं कॅप्शनमध्ये लिहिले होते, 'तुमचा सीटबेल्ट बांधा, तुमचे पॉपकॉर्न तयार ठेवा. राजेश ए कृष्णन यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन केले आहे. तर अनिल कपूर यांची मुलगी रिया कपूर व एकता कपूर यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. या चित्रपटात प्रेक्षकांना तीन एअर होस्टेसची कथा पाहायला मिळणार आहे. या चित्रपटात करीना, क्रिती व तब्बू व्यतरिक्त दिलजीत दोसांझही महत्त्वाच्या भूमिकेत दिसणार आहे.



## 'थंगबली'कडे नव्हते 11 महीने काम

शाहरुख खान व दीपिका पदूकोणचा 'चेन्नई एक्सप्रेस' हा चित्रपट आजही प्रेक्षकांच्या आवडत्या चित्रपटांपैकी एक आहे. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगलाच धुमाकूळ घातला. शाहरुखच्या करिअरमधील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत 'चेन्नई एक्सप्रेस' हा चित्रपट अव्वल ठरतो. याच चित्रपटातील दीपिकाच्या पात्राबरोबरच इतरही दाक्षिणात्य कलाकार पाहायला मिळाले. 'बाहुबली'मध्ये 'कट्टपा'ही भूमिका साकारणाऱ्या सत्यराज यांची खूप चर्चा झाली. याबरोबरच आणखी एक पात्र प्रेक्षकांच्या स्मरणात राहिलं ते म्हणजे थंगबली.'थंगबली' हे धमाल पात्र साकारणारा अभिनेता निकितिन धीर हा सध्या चर्चेत आहे. निकितिन नंतर सलमान खानच्या 'अंतिम' आणि अक्षय कुमारच्या 'सूर्यवंशी'सारख्या चित्रपटातही झळकला. परंतु 'चेन्नई एक्सप्रेस'नंतर आलेला अनुभव त्याने नुकताच शेअर केला आहे. या चित्रपटानंतर आपल्याला भरपुर चित्रपटांच्या ऑफर्स येतील असा समज निकितिन धीरचा होता, पण तसं काहीच झालं नाही. 'चेन्नई एक्सप्रेस'च्या यशानंतर तब्बल ११ महीने निकितिनकडे काहीच काम नसल्याचा खुलासा त्याने केला."चेन्नई एक्सप्रेसनंतर माझं आयुष्यच पालटून जाईल असं मला वाटलं होतं. मला ठाऊक होतं की हा चित्रपट शाहरुख खान आणि दीपिका पदूकोण यांच्या करिअरमधला एक जबरदस्त हीट चित्रपट ठरणार आहे. की रातोरात माझी लोकप्रियता वाढली. लोक मला ओळखू लागले. इतक्या वर्षांच्या मेहनतीचं फळ मिळालं असं मला वाटलं. पण तुम्हाला हे ऐकून आश्चर्य वाटेल की चित्रपट प्रदर्शित झाल्यावर जवळपास ११ महीने माझ्याकडे काहीच काम नव्हते.

## रकुल प्रीत सिंग व जॅकी भगनानी मुंबईत दाखल

बॉलीवूड अभिनेता जॅकी भगनानी व अभिनेत्री रकुल प्रीत सिंग २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकले. गोव्यात त्यांच्या शाही लग्नसोहळ्याची तयारी करणात आली होती. कुटुंबीय व जवळच्या मित्र-मैत्रीणींच्या उपस्थितीत हा लग्नसोहळा पार पडला. जॅकी व रकुलच्या लग्नाला बॉलीवूडमधील अनेक कलाकारांनी हजेरी लावली होती.गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्या लग्नाची चर्चा सुरु होती. अखेर गोव्यात समुद्रकिनारी दोघांनी लग्नगाठ बांधली. रकुल व जॅकीच्या लग्नाचे फोटो व व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहेत. जॅकीने पांढऱ्या रंगाची शेरवानी परीधान केली होती तर रकुलने बेबी पिंक रंगाचा सुंदर लेहंगा व त्यावर भरजरी दागिने घातले होते. या लूकमध्ये दोघेही खूपच सुंदर दिसत होते. आता लग्नानंतर दोघे मुंबईत दाखल झाले आहेत. मुंबईतील त्यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. व्हिडीओमध्ये रकुल व जॅकी पापराझींना पोझ देताना दिसत आहेत. यावेळी रकुलने सोनेरी रंगाची अनारकली ड्रेस परिधान केला होता. भांगेत कुंकू, हातात चुडा घातलेली रकुल खूपच सुंदर दिसत होती. तर जॅकीने पांढऱ्या रंगाची चिकन वर्क केलेली शेरवानी घातली होती. यावेळी दोघांनी पापराझींना लाडूचेही वाटप केले.गोव्यात लग्न केल्यानंतर रकुल व जॅकी हनिमूनला कुठे जाणार याबाबत चाहत्यांना उत्सुकता लागली आहे. बॉम्बे टाइम्सने दिलेल्या माहितीनुसार, रकुल व जॅकीने लग्नानंतर हनिमूनला जाण्याची योजना रद्द केली असल्याचे सांगण्यात येत आहे. कारण-व्यग्र वेळापत्रकामुळे दोघे लग्नानंतर काही दिवसांमध्येच कामावर परतणार आहेत. बॉलीवूड अभिनेता जॅकी भगनानी व अभिनेत्री रकुल प्रीत सिंग २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकले. गोव्यात त्यांच्या शाही लग्नसोहळ्याची तयारी करणात आली होती.



# जो रुटच्या शतकी खेळीने इंग्लंडला सावरलं!

## आकाश दीपने पदार्पणातच घेतल्या तीन विकेट्स!

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**रांची येथे भारत आणि इंग्लंड संघातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना खेळला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर इंग्लंडने जो रुटच्या शतकाच्या जोरावर ७ बाद ३०२ धावा केल्या आहेत. जो रूट १०६ धावा करून नाबाद परतला. तर, ओली रॉबिन्सन ३१ धावा करून क्रीजवर आहे. या सामन्यात भारताकडून पदार्पणवीर आकाश दीपने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.**




पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर इंग्लंडने सात गडी गमावून ३०२ धावा केल्या आहेत. सध्या ऑली रॉबिन्सन ३१ धावांवर नाबाद असून जो रूट १०६ धावांवर नाबाद आहे. दोघांमध्ये ५७ धावांची भागीदारी झाली आहे. आज पहिले सत्र भारताच्या नावावर होते. आकाश दीपच्या तीन विकेट्सने इंग्लंडच्या आघाडीच्या फळी उखडून टाकली. त्याने बेन डकेट (११), ऑली पोप (०) आणि जॅक क्रोली (४२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर अश्विनने जॉनी बेअरस्टोला पॅव्हेलियनमध्ये तर रवींद्र जडेजाने बेन स्टोक्सला पॅव्हेलियनमध्ये पाठवून इंग्लंडचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये पाठवला. बेअरस्टोला ३८ तर स्टोक्सला तीन धावा करता आल्या.लंचपर्यंत पहिल्या सत्रात इंग्लंडने पाच विकेट गमावून ११२ धावा केल्या होत्या. यानंतर दुसऱ्या सत्रात म्हणजेच चहापानाच्या वेळेपर्यंत जो रूट आणि बेन फॉक्स यांनी एकही विकेट पडू दिली नाही. त्या सत्रात दोघांनी मिळून ८६ धावा जोडल्या. तिसऱ्या सत्रानंतर म्हणजेच चहाच्या वेळेनंतर सिराजने टीम इंडियाचे पुनरागमन केले. त्याने रूट आणि फॉक्सची ११३ धावांची भागीदारी मोडली. ज्यामुळे फॉक्सचे अर्धशतक हुकले. तो ४७ धावा करून सिराजच्या चेंडूवर झेलबाद झाला. त्याचवेळी टॉम हार्टले १३ धावा करून सिराजच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला.यानंतर रूटने आपल्या कसोटी कारकिर्दीतील ३१ वे शतक झळकावले. त्याने ऑली रॉबिन्सनसह इंग्लंडचा डाव सांभाळला आहे. भारताकडून आतापर्यंत आकाशने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या आहेत. त्याचवेळी सिराजला दोन विकेट मिळाल्या. रवींद्र जडेजा आणि अश्विनला प्रत्येकी एक विकेट मिळाली. तिसऱ्या सत्रात इंग्लंडने 29 षटकांत दोन गडी गमावून 104 धावा केल्या. पहिल्या दिवशी फलंदाजीसाठी उतरलेल्या इंग्लंडच्या संघाकडून जो रुटने शतकी खेळी केली. त्याच्याशिवाय इतर कोणत्याही फलंदाजीला मोठी धावसंख्या उभारता आलेली नाही.

इंग्लंडकडून, झॅक क्राऊली 42 चेंडूमध्ये 42, बेन डकेट 21 चेंडूमध्ये 11, जो रुट 226 चेंडूमध्ये 106 (नाबाद) , जॉनी बेयरस्टो 35 चेंडूमध्ये 38, बेन स्टोक्सने 126 चेंडूमध्ये 47 धावा आणि ओली रॉबीनसनने 60 चेंडूमध्ये (नाबाद) 31 धावांचे योगदान दिले आहे. इंग्लंडने पहिल्या दिवसअखेर 7 विकेट्स गमावत 90 षटकात 302 धावा केल्या. जो रुटने या सामन्यात 31 वे शतक पूर्ण केले. रुट 106 धावांवर आणि रॉबिनसर 31 धावा करत नाबाद आहेत. पहिला सेशन पूर्णपणे भारताच्या नावावर राहिला होता. सुरुवातीच्या सेशनमध्येच टीम इंडियाने इंग्लंडचा निम्मा संघ तंबूत धाडला होता. तर दुसऱ्या सेशनमध्ये इंग्लंडने वापसी केली.

दुसऱ्या सेशनमध्ये इंग्लंडने 86 धावा कुटल्या. तर तिसरे सेशनमध्ये दोन्ही संघाने तुल्यबळ कामगिरी केली. भारताने 2 विकेट्स पटकावल्या. तर रुटने शतक पूर्ण केले. टीम इंडिया आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना सुरू झाला. टॉस जिंकल्यानंतर इंग्लंडचा संघ सर्वात आधी फलंदाजीसाठी मैदानात आला. इंग्लडचे जॅक क्रॉली आणि बेन डकेट ओपनिंगसाठी मैदानात आले.

टीम इंडियाकडून मोहम्मद सिराजनं गोलंदाजी सुरू केली. त्यानंतर डावातील चौथं षटक टाकत असलेल्या आकाश दीपनं चौथ्या चेंडूवर जॅक क्रॉलीला बोल्ड केलं, परंतु पंचांनी तो नो बॉल दिला आणि कसोटीतील पहिला विकेट आकाशच्या हातून निसटला. पण त्यानंतर अवघ्या काही वेळातच आकाशन संधी साधलीच. इंग्लंडला पहिला धक्का बसला, तो डकेटच्या रूपानं. बेन डकेट 11 धावा करून बाद झाला.

### पोप खातंही उघडू दिलं नाही

आकाश दीपनं डावाच्या दहाव्या षटकात पहिला कसोटी बळी घेतला. आकाश दीप एवढ्यावरच थांबला नाही, त्यानं एकापाठोपाठ एक अशा तीन दिग्गज खेळाडूंना माघारी धाडलं. ऑली पोपच्या रूपानं इंग्लंडनं दुसरी विकेट गमावली. डावाच्या 10व्या षटकातील चौथ्या चेंडूवर आकाश दीपनं ऑली पोला खातंही उघडू दिलं नाही आणि शून्यावरच त्याला माघारी धाडलं. ओव्हरच्या दुसऱ्या चेंडूवर आकाशनं बेन डकेटला बाद केलं होतं. डकेट आणि पोपनंतर आकाशनं जॅक क्रॉलीलाही माघारी धाडलं. पदार्पणाची कसोटी खेळत असलेल्या आकाश दीपनं तिसरी विकेट घेतली.

# मॅक्सवेलने फिंचचा विक्रम मोडत रचला इतिहास !

## ऑस्ट्रेलियासाठी ‘ही’ कामगिरी करणारा ठरला पहिला फलंदाज

।नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसरा सामना ७२ धावांनी जिंकून ऑस्ट्रेलियाने आता मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियन संघाचा स्टार ऑलराऊंडर खेळाडू ग्लेन मॅक्सवेलनेही एक मोठी कामगिरी आपल्या नावावर केली आहे, ज्यामध्ये तो आता टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ऑस्ट्रेलियासाठी सर्वाधिक षटकार ठोकणारा खेळाडू ठरला आहे.**



मात्र, या सामन्यात मॅक्सवेलला फलंदाजीत विशेष काही करता आले नाही आणि चार चेंडूत एका षटकारासह केवळ ६ धावा करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला.ग्लेन मॅक्सवेलच्या आधी ऑस्ट्रेलियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम माजी कर्णधार ॲरॉन फिंचच्या नावावर होता, ज्यांनी १०३ सामने खेळताना १२५ षटकार ठोकले होते. आता मॅक्सवेलने त्याला मागे टाकले असून त्याने १०५ सामन्यांमध्ये १२६ षटकार ठोकले आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर डेव्हिड वॉर्नर आहे, ज्याने आतापर्यंत ११३ षटकार ठोकले आहेत. याशिवाय टी-२० इंटरनॅशनलमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ग्लेन मॅक्सवेल तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे, ज्यामध्ये तो आता या यादीत फक्त मार्टिन गुप्टिल आणि रोहित शर्माच्या मागे आहे.ऑकलंडच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या या दुसऱ्या टी-२० सामन्याबद्दल सांगायचे तर, ऑस्ट्रेलियन संघाने प्रथम फलंदाजी करताना ११५ धावांपर्यंत ५ विकेट गमावल्या होत्या. यामध्ये सलामीवीर हेडने २२ चेंडूत ४५ धावांचे योगदान दिले. त्यानंतर पॅट कमिन्सच्या २८ धावांच्या खेळीच्या जोरावर संघाला १७४ धावसंख्येपर्यंत मजल मारता आली. यानंतर ऑस्ट्रेलियाने शानदार गोलंदाजी केली आणि न्यूझीलंडचा न्यूझीलंडचा डाव १७ षटकांत १०२ धावांवर रोखला. न्यूझीलंडकडून ग्लेन फिलिप्सने सर्वाधिक ४२ धावांचे योगदान दिले. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजीत ॲडम झाम्पाने ४ तर नॅथन एलिसने २ विकेट्स घेतल्या. याशिवाय जोश हेझलवूड, पॅट कमिन्स आणि मिचेल मार्श यांनीही १-१ विकेट घेतली.

### सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम

मॅक्सवेलला फलंदाजीत विशेष काही करता आले नाही आणि चार चेंडूत एका षटकारासह केवळ ६ धावा करून तो पॅव्हेलियनमध्ये परतला.ग्लेन मॅक्सवेलच्या आधी ऑस्ट्रेलियासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम माजी कर्णधार ॲरॉन फिंचच्या नावावर होता, ज्यांनी १०३ सामने खेळताना १२५ षटकार ठोकले होते. आता मॅक्सवेलने त्याला मागे टाकले असून त्याने १०५ सामन्यांमध्ये १२६ षटकार ठोकले आहेत. या यादीत तिसऱ्या क्रमांकावर डेव्हिड वॉर्नर आहे, ज्याने आतापर्यंत ११३ षटकार ठोकले आहेत. याशिवाय टी-२० इंटरनॅशनलमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत ग्लेन मॅक्सवेल तिसऱ्या स्थानावर पोहोचला आहे.